शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

५० वा वार्षिक दीक्षान्त समारंभ

मंगळवार, दि. १८ फेब्रुवारी, २०१४

मा. प्रा. (डॉ.) ना. ज. पवार

कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

यांनी सादर केलेला अहवाल

५० वा दीक्षान्त समारंभ

प्रा. डॉ. एन्. जे. पवार,

कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

यांनी सादर केलेला अहवाल

शिवाजी विद्यापीठाचा ५० वा सुवर्ण महोत्सवी दीक्षान्त समारंभ आज संपन्न होत आहे. या समारंभाचे प्रमुख पाहुणे सिक्कीम राज्याचे राज्यपाल आदरणीय श्री. श्रीनिवास पाटीलसाहेब, समारंभास आवर्जून उपस्थित असलेले श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, उपस्थित मान्यवर, आमदार, खासदार, महापौर, नगरसेवक, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, अधिसभा, विद्या परिषदेचे व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, नूतन पदवीधर, इतर विद्यार्थी, माध्यमांचे प्रतिनिधी आणि मित्रहो, आजच्या या दीक्षान्त सोहळयासाठी मी आपले सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करतो.

सुरूवातीलाच ५० व्या दीक्षान्त समारंभात पदवी व पदविका प्राप्त करणाऱ्या सर्व स्नातकांना मी मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

मला नमूद करण्यास आनंद वाटतो की, शिवाजी विद्यापीठ हे छत्रपती शिवाजी महाराज या थोर महापुरुषाच्या नावाने सुरु झालेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठाला लोकप्रणेते राजर्षि छत्रपती शाहू महाराज, थोर समाजसुधारक महात्मा फुले आणि भारताच्या घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर या सर्वांच्या विचारांचा वारसा लाभला आहे. छत्रपती राजाराम महाराज आणि डॉ. बाळकृष्ण यांचे कोल्हापूरात विद्यापीठ व्हावे असे स्वप्न होते. हे स्वप्न साकार करण्यासाठी कै. मा. यशवंतरावजी चव्हाण, लोकनेते बाळासाहेब देसाई, बॅ. खर्डेकर, डॉ. सी. रा. तावडे आणि या परिसरातील अनेक मान्यवर यांनी प्रयत्न केले. विद्यापीठ स्थापनेनंतर या विद्यापीठाच्या उभारणीत डॉ. आप्पासाहेब पवार यांनी अथक प्रश्रिम घेतले याचा मी येथे आवर्जून उल्लेख करतो.

आपल्या विद्यापीठाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आपण नुकतेच साजरे केले. या सुवर्ण महोत्सवी वर्षात विद्यापीठास महाराष्ट्र शासनाने ४५ कोटी रकमेचा निधी जाहीर केला त्यामधील ७.७ कोटी रुपयांचा निधी विद्यापीठास प्राप्त झाला आहे. त्याबद्दल मी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सर्व मंत्रीमंडळ आणि प्रशासकीय अधिकारी यांना मन:पूर्वक धन्यवाद देतो.

विद्यापीठाचे कार्यक्षेत्र कोल्हापूर, सातारा, आणि सांगली या तीन जिल्ह्यामध्ये विस्तारले असून संलग्नित महाविद्यालयांची संख्या २८१ वर गेली आहे. शिवाय १३ संशोधन संस्था विद्यापीठाशी संलग्नित आहेत. विद्यापीठात ४० पदव्यूत्तर शिक्षण देणारे अधिविभाग कार्यरत आहेत. तसेच महाविद्यालयांतूनसुध्दा पदवीबरोबर पदव्युत्तर विभागही सुरु आहेत सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांना ८ विविध विद्याशाखातून पदवी आणि पदव्युत्तर उच्च शिक्षण आणि संशोधन स्तरावरील शिक्षण दिले जाते. याबरोबरच काम करुन शिकणारे विद्यार्थी, शिक्षणाच्या नियमित प्रवाहात काही कारणाने येऊ न शकणारे असे सुमारे ४४००० विद्यार्थी दूरशिक्षण माध्यमातून शिक्षण घेत आहेत. विद्यापीठ परिक्षेत्रातील १६ महाविद्यालयांना नॅक चे 'ए' मानांकन प्राप्त झाले आहे आणि काही महाविद्यालयांना College with Potential for Excellence हा दर्जा मिळाला आहे. उच्च शिक्षणातील Gross Enrollment Ratio (GER) वाढला पाहिजे याबाबत केंद्र शासन आणि राज्य शासन आग्रही आहे आणि त्यादृष्टीने विद्यापीठाची वाटचाल सुरु आहे. विद्यापीठात देशातील थोर पुरुष, महान व्यक्ती, विचारवंत, संत यांच्या नावाने अनेक अध्यासने सुरु आहेत.

मला पाहुण्यांना सांगण्यास आनंद होतो की, विद्यापीठाने नॅनोटेक्नॉलॉजी या प्रगत शास्त्रशाखेतील युजी/पीजी इंटिग्रेटेड प्रोग्रॅम गतवर्षी सुरु केलेला आहे. या विभागाच्या स्वतंत्र इमारतीचे बांधकाम वेगाने सुरु आहे तसेच महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त होत असलेल्या अनुदानातून यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट सुरु झाले आहे आणि त्याअंतर्गत Master of Rural Studies, Master of Social Work, Master of Computer Applications असे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमही सुरु झाले आहेत.

विद्यापीठाच्या विकासासाठी, संशोधन कार्यात विविध अधिविभागातील प्राध्यापक सतत प्रयत्नशील असल्याने UGC, DBT, DST, ICSSR, RGST Mumbai, SERB, ICHR, SER, CSIR, MOEF, BRNS, DRDO या सर्व शिखर संस्थांकडून विद्यापीठास भरघोस निधी प्राप्त झाला आहे. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी या विभागास TEQIP या योजने अंतर्गत वर्ल्ड बँकेकडून १० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. विशेष आनंदाची बाब म्हणजे विद्यापीठातील १० विभागांना DST-FIST या योजने अंतर्गत अनुदान प्राप्त झाले आहे.DBT यांच्यामार्फत IPLS प्रोग्रॅम मिळालेले आपले विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ आहे. विद्यापीठात विविध उपक्रमांचे संशोधन मोठया प्रमाणावर सुरु आहे. त्यामध्ये १० विभागांना UGC-SAP अंतर्गत अनुदान प्राप्त झाले आहे, ८ विभागांमध्ये DST-PURSE प्रोग्रॅम सुरु आहेत. हा प्रोग्रॅम

राबविणाऱ्या देशातील ३० विद्यापीठांमधील उत्तम ४ विद्यापीठांमध्ये आपल्या विद्यापीठाचा समावेश आहे. तसेच DST-SAIF हाही प्रोग्रॅम सुरु आहे. या विविध योजनेअंतर्गत या वर्षी सुमारे २२ कोटी १५ लाख इतके भरघोस अनुदान विद्यापीठास प्राप्त झाले आहे आणि आजवर प्राप्त झालेल्या अनुदानामध्ये हे उच्चांकी अनुदान आहे. राष्ट्रीय स्तरावरील संशोधन पातळीवर भारतातील विद्यापीठांचे जे मूल्यांकन झाले त्यामध्ये आपल्या विद्यापीठाचा 'P' INDEX ४७ इतका असून त्यामुळे आपले मानांकन देशात २५ वे आहे. विद्यापीठाच्या बायोटेक्नॉलॉजी विभागाने देशातील २० बीटी स्कूलमध्ये ८ वे स्थान मिळविले आहे. विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाने सौरउर्जेमध्ये भरीव संशोधन केले आहे आणि त्यामुळे देशातील सौरउर्जेमध्ये संशोधन करणाऱ्या विभागांमध्ये आपल्या या विभागाचा देशात तिसरा क्रमांक आहे आणि मटेरीयल सायन्समध्ये २० वा क्रमांक आहे. शैक्षणिक विचारांची देवाण–घेवाण आणि संशोधनाला गती देण्यासाठी विद्यापीठाने ०३ आंतरराष्ट्रीय आणि ०५ राष्ट्रीय परिषदांचे यशस्वी आयोजन केले आहे. त्यामध्ये भौतिकशास्त्र, प्राणिशास्त्र आणि हिंदी विभागांनी आंतरराष्ट्रीय तर रसायनशास्त्र, अॅग्रो केमिकल अॅण्ड पेस्ट मॅनेजमेंट, इलेक्ट्रॉनिक्स, इंग्लिश व गांधी अभ्यास केंद्र या विभागांनी राष्ट्रीय परिषदा आयोजित केल्या. विद्यापीठ अधिविभागांबरोबरच महाविद्यालयातून सुध्दा संशोधन वाढले पाहिजे यादृष्टीने महाविद्यालयातून तज्ज्ञ संशोधकांची व्याख्याने आयोजित करण्यात आली आणि त्याचा संशोधन वाढीत चांगला परिणाम दिसून येत आहे. Science Citation Index (SCOPUS) मध्ये आजपर्यंत विद्यापीठाने ३१६१ पेपर प्रसिध्द केले आहेत. त्यामध्ये ११२० संशोधकांनी आपले योगदान दिले आहे. संशोधन वाढीस लागण्यासाठी आणि संशोधनाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठाने रशिया, जपान, द. कोरिया, ब्राझील, फ्रान्स थायलंड, इटली, नायजेरीया, ऑस्ट्रेलिया अशा विविध प्रगत देशातील नामवंत विद्यापीठांशी सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठाची ही संशोधनातील कामगिरी पहाता मी असे खात्रीने म्हणू शकतो की, आमचे विद्यापीठ आता जागतिक स्तरावर पोहोचले आहे.

विद्यार्थी, शिक्षक आणि समाजातील नागरिकांपर्यंत प्रबोधनपर चांगले विचार पोहचले पाहिजेत म्हणून विद्यापीठ अनेक व्याख्यानमाला आयोजित करते, काही व्याख्यानमाला महाविद्यालयांमार्फतही आयोजित केल्या जातात त्यांचा लाभ समाजातील सर्व स्तरावरील लोकांना होत आहे.

ज्ञाननिर्मिती हे विद्यापीठाचे एक प्रमुख उद्दिष्ट मानले जाते त्यादृष्टीने विद्यापीठाने काही उत्तम ग्रंथ प्रकाशित केले आहेत. त्यामध्ये Studies in Maratha History चे २ खंड, क्षात्रजगद्गुरु विचार दर्शन, ज्येष्ठ नागरिकांच्या अभ्यासावरील ग्रंथ, साताऱ्याचे शाहू महाराज यांच्यावरील ग्रंथ अशा अनेक उत्तम ग्रंथांचे प्रकाशन केले आहे. त्याशिवाय विविध परिषदा आणि कार्यशाळा यांचे अहवालही प्रसिध्द केले आहेत.

अध्यापन आणि संशोधन या कार्यामध्ये सतत कार्यरत असलेल्या आमच्या काही प्राध्यापकांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुमान मिळविला आहे. त्यामध्ये प्रा. प्रमोद पाटील यांना कोरियन विद्यापीठाची Brainpool ही मानाची फेलोशिप आणि महाराष्ट्र ॲकॅडेमी ऑफ सायन्सेस यांची फेलोशिप प्राप्त झाली आहे. इंग्रजी विभागाचे माजी विद्यार्थी आणि माजी प्राध्यापक डॉ. गणेश देवी यांना भारत सरकारने पद्मश्री पदवीने गौरविले आहे तसेच जैवरसायनशास्त्र विभागाचे डॉ. गोविंदवार यांना राज्य शासनाने आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविले आहे या सर्वांच्या कामगिरीचा आम्हास अभिमान वाटतो.

विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, संशोधक विद्यार्थी या सर्वांना उत्तम सोयी–सुविधा देण्याचा आमचा सदैव प्रयत्न असतो त्यादृष्टीने अनेक प्रकारच्या भौतिक सुविधा या काही वर्षात विद्यापीठाने उपलब्ध करुन दिल्या आहेत. यामध्ये अद्ययावत असे डाटा सेंटर, ग्रंथालयाच्या इमारतीचे विस्तारीकरण, परीक्षा विभागाच्या ॲनेक्स इमारतीचे विस्तारीकरण आणि बी. टेक. इमारतीचे विस्तारीकरण या सर्व कामासाठी आजवर रुपये १२ कोटी खर्च झाले आहेत. विशेष आनंदाची बाब म्हणजे दि. २०.२.२०१४ रोजी महाराष्ट्राचे मा.राज्यपाल यांच्या शुभहस्ते आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटीक ट्रॅकचे उद्घाटन करीत आहोत. या सिंथेटीक ट्रॅकसाठी महाराष्ट्र शासनाने १.९१ कोटी रुपये मंजूर करुन त्यापैकी १.१७ कोटी दिले आहेत. युजीसीने १.२१ कोटी रुपयांचे अनुदान दिले असून विद्यापीठाने स्वत:च्या फंडातून २.२८ कोटी उभे करुन ही महत्वकांक्षी प्रकल्प पूर्ण केला आहे. आपले खेळाडू विद्यार्थी विविध खेळामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले आहेत. या सुविधेमुळे त्यात आणखी भर पडेल अशी मला आशा वाटते. विद्यापीठ परिसरामध्ये लीड बोटॅनीकल गार्डन ही केंद्रे कार्यरत आहेत. विद्यापीठाच्या पन्हाळा येथील जागेवर स्पेस सायन्स सेंटरची उभारणी करण्यात येत आहे.

आपले विद्यापीठ हे विशिष्ट हेतूने सुरु झालेले विद्यापीठ आहे यामध्ये बहुजन समाजातून, खेडयापाडयातून आलेले गरजू विद्यार्थी माफक शुल्कामध्ये उत्तम शिक्षण घेवून बाहेर पडले पाहिजेत याबद्दल आम्ही आग्रही आहोत. या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सुसज्ज वसतिगृहे, 'कमवा व शिका योजना', 'गरजेनुसार काम या योजना', त्यामध्ये करमणूक आणि इंटरनेट यांच्या सुविधा, त्यांना अभ्यासासाठी ग्रंथालयामधून उत्तम दर्जाचे ग्रंथ आणि ई–जर्नल्स, इंटरनेटची सुविधा तसेच विद्यार्थी सुविधा केंद्र ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार आवश्यक ती सर्व कागदपत्रे एका दिवसात मिळावीत अशा सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत.

विद्यापीठामध्ये गेल्या अनेक वर्षात नेट परीक्षेचे केंद्र उपलब्ध नव्हते या वर्षी युजीसीने विद्यापीठास स्वतंत्र NET चे सेंटर मंजूर केले आणि पहिल्याच वर्षी सुमारे ४००० विद्यार्थ्यांनी ३९ विविध विषयांसाठी परीक्षा दिली. या केंद्राची जबाबदारी प्रा.डॉ.एम.बी.देशमुख यांनी अत्यंत सक्षमतेने पार पाडली आहे. याबरोबरच SET परीक्षेचे उपकेंद्रही यशस्वीरित्या कार्यरत असून यावर्षी या केंद्रामार्फत ८५०० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

कला, क्रीडा आणि सांस्कृतिक या क्षेत्रातील प्रगतीबरोबरच विद्यापीठाने आपली सामाजिक जबाबदारीही सातत्याने बजावलेली आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून दुष्काळी भागात जलसंधारण कामकाज, महाराष्ट्र शासनाच्या 'निर्मल ग्राम' योजनेतील कामगिरी, दुष्काळी भागातील गावांना मोफत चारा वाटप अशा विविध समाजपयोगी उपक्रम विद्यापीठाने यशस्वीरित्या राबविले आहेत. याबरोबरच विद्यार्थ्यांनींना सक्षम आणि निर्भिड बनविण्यासाठी निर्भया अभियानसुध्दा राबविले आहे. एनएसएस बरोबरच एनसीसीमध्येसुध्दा विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी बजावली आहे.

गेल्या काही वर्षामध्ये विद्यापीठाने ICT Based Governance साठी मोहिम घेतली आहे. तत्पर, पारदर्शी आणि जबाबदार प्रशासन करण्यासाठी ICT चा मोठया प्रमाणात प्रशासनात वापर झाला पाहिजे ही भूमिका घेऊन सर्व प्रशासकीय विभागामार्फत कामकाज सुरु आहे त्यामध्ये वित्त विभागाच्या संपूर्ण कामकाजाचे यशस्वीरित्या संगणकीकरण आणि संगणक प्रणालीद्वारे कारभार सुरु आहे. आपल्या विद्यापीठाने बनविलेला अकौंटस् कोड हा शासनाने अन्य विद्यापीठांनीसुध्दा लागू करावा अशी शिफारस केली आहे.

परीक्षा विभागाने विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून, परीक्षा फॉर्म भरण्यापासून निकाल लागेपर्यंत आणि निकालानंतरचे पुर्नमुल्यांकन या सर्व कामात ICT चा वापर सुरु केला आहे. विद्यापीठाने परीक्षेचे निकाल वेळेत जाहीर करण्याची परंपरा कायम राखली आहे त्यासाठी मा. राज्यपाल यांनी त्याचे कौतुक केले आहे आणि महाराष्ट्र शासनाने अन्य विद्यापीठांनाही शिवाजी विद्यापीठाकडून मार्गदर्शन घ्यावे असे कळविले आहे. राज्य शासनाच्या अग्रवाल समितीच्या परीक्षा सुधार योजनेतील संगणकीकृत माध्यमातून प्रश्नपत्रिका गोपनीयरित्या पाठविण्याचे कामकाज यशस्वीरित्या सुरु आहे. विद्यापीठ स्थापनेपासून परीक्षा संबंधी सर्व कागदपत्रांचे डिजीटायझेशन करण्याचा एक महत्वकांक्षी प्रकल्प पूर्ण झाला आहे ज्यामुळे विद्यार्थ्यांना आता तत्परतेने सेवा देणे शक्य होणार आहे. On Screen Evaluation आणि Bar-coaded answerbooks या पध्दती राबविण्याचे प्रयत्न सुरु आहेत. विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील पदव्युत्तर कोर्सेसना Choice Based Credit System पध्दती अंमलात आणली आहे.

संलग्नता विभागाच्या बीयुटीआर विभागाकडून एम.फिल. व पीएच.डी. प्रवेश परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली आहे. पीएच.डी. मार्गदर्शकांची संपूर्ण माहिती ऑनलाईन उपलब्ध आहे. सर्व प्रकारचे महाविद्यालयीन स्तरावरचे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याशी निगडीत माहिती तात्काळ उपलब्ध होण्याच्यादृष्टीने संगणकीय प्रणाली वापरण्यास स्वतंत्र प्रयत्न सुरु आहेत. संलग्नता विभागामध्ये लीड कॉलेज ही अभिनव योजना कार्यरत असून त्याद्वारे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी विविध उपक्रम घेतले जातात. नियमित शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगी विशिष्ट कौशल्ये बाणविण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना सत्वर रोजगार मिळण्याच्यादृष्टीने काही Online Skill Based Courses सुरु करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. प्राचार्यांच्या प्रशासकीय अडचणी समजून घेण्यासाठी विविध कार्यशाळा आयोजित केल्या आहेत.

विद्यार्थी अलिकडे स्पर्धा परीक्षांकडे वळत आहेत हे लक्षात घेऊन विद्यापीठात अशा विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केंद्र कार्यरत आहे आणि त्यातून यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही लक्षणीय आहे. या विद्यार्थ्यांसाठी नियतकालिके, पुस्तके आणि अभ्यासिका या सोयीही उपलब्ध करुन दिल्या आहेत. विद्यापीठात डॉ.बाबासाहेब आंबेडकर सेंटर फॉर रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंटच्या माध्यमातून एमपीएससीच्या परीक्षेत अनेक विद्यार्थी अधिकारी आणि प्रशासकीय सेवेत निवडले गेले आहेत.

विद्यापीठाच्या विविध अधिविभागामधून ICT Based Teaching Learning चा वापर सुरु झाला आहे. मुडलच्या (MOODLE) माध्यमातून काही उपयुक्त कोर्सेस ऑनलाईन लर्निंग मोडमधून राबविले जात आहेत. आपल्या संलग्नित महाविद्यालयांपैकी १६६ महाविद्यालये नॅशनल नॉलेज नेटवर्कमधून जोडलेली आहेत ज्याद्वारे देशविदेशातील तज्ज्ञांची उपयुक्त विषयावरील व्याख्यानांचा लाभ विद्यार्थी आणि शिक्षक घेत आहेत. विद्यापीठ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची दीर्घकाळ रिक्त असलेल्या पदांची भरती मोहिम यशस्वीपणे राबविण्यात आली आहे आणि त्यामुळे प्रशासनाला गती आली आहे.

विद्यापीठामध्ये मध्यवर्ती प्लेसमेंट सेल कार्यरत असून विविध कंपन्यांना कॅम्पस मुलाखतीसाठी बोलावून सुमारे १६०० विद्यार्थ्यांना नोकऱ्या उपलब्ध करुन देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

विद्यापीठाच्या क्रीडा विभागाची कामगिरी नेत्रपदीक आहे. यावर्षी महाराष्ट्र राज्य आंतरराष्ट्रीय क्रीडा महोत्सव आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे संपन्न झाला त्यामध्ये विद्यापीठास जनरल चॅम्पियनशिपमध्ये दुसरा क्रमांक मिळाला तसेच विविध वैयक्तिक स्पर्धांमध्ये एक सुवर्णपदक, २ रौप्यपदके आणि ६ कास्यपदके मिळाली आहेत. तसेच सांघिक स्पर्धांमध्ये खो-खो/कब्बड्डी मध्ये सुवर्ण पदक, व्हॉलिबॉलमध्ये रौप्यपदक आणि बास्केटबॉलमध्ये कास्यपदक अशी पदके मिळाली आहेत. तसेच आखिल भारतीय आंतरविद्यापीठीय पश्चिम विभागीय स्पर्धेमध्ये आर्चरीमध्ये सुवर्ण, मल्लखांबमध्ये रौप्य तर कब्बड्डीमध्ये द्वितीय, फुटबॉलमध्ये तृतीय व बॅडमिंटनमध्ये तृतीय अशी पदके प्राप्त झाली आहेत. विद्यापीठाच्या क्रीडा विभागाने आजवर अनेक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार केले आहेत.

तिनही जिल्हयातील विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी तसेच त्यांना प्रशिक्षीत करण्यासाठी विद्यापीठाने या वर्षापासून 'छात्रसंसद' हा नावीन्यपूर्ण उपक्रम सुरु केला आहे त्याची पहिली सभा कोल्हापूरमध्ये शहाजी महाविद्यालयात घेण्यात आली. विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागामार्फत युवा महोत्सव, एन.एस.एस, अविष्कार, आव्हान, उत्कर्ष अशा अनेक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचे मोठे योगदान आहे. या वर्षी छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा येथील विद्यार्थिनी कु.मानसी शिर्के ही जपानमध्ये संपन्न झालेल्या Global Leadership Development Programme मध्ये सहभागी झाली. राज्यस्तरीय उत्कर्ष या Social and Cultural Competiton मध्ये विद्यापीठास अनेक पदके प्राप्त झाली त्यामध्ये फोटोग्राफीस प्रथम, पोवाडा

द्वितीय, ग्रुप साँग द्वितीय, पेंटिंग ॲण्ड पोस्टर मेकिंग तृतीय असे क्रमांक प्राप्त झाले. Best Actress उत्कर्ष म्हणून कु. नंदा बोलये या संगित नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थीनीस गोल्डन गर्ल म्हणून गौरविण्यात आले. Road Safety Championship मध्ये महाराष्ट्रात आपल्या विद्यापीठाने चतुर्थ क्रमांक पटकाविला आहे. या विभागांतर्गत युवक बिरादारी, करिअर कौन्सिलींग, Pre SRD and NRD Camp, निर्भया अभियान, स्वच्छता मोहिम, मतदार जागृती, गांधी विचार कॅम्प, साहस कॅम्प, सामाजिक विकास जनजागृती अशा अनेक उपक्रमातून विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील विद्यार्थी/विद्यार्थिनींनी सहभागी होवून विद्यापीठाची सामाजिक बांधीलकी समर्थपणे जपली आहे.

आपल्या विद्यापीठातील विद्यार्थी सध्याच्या बदलत्या स्पर्धेला चांगल्या पध्दतीने तोंड देण्यासाठी तयार व्हावा यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्देशित केल्याप्रमाणे अनेक महाविद्यालयांमध्ये युवक कल्याण कक्षाची स्थापना करुन वेगवेगळया कौशल्य विकासाचे उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये ३७०० हून अधिक युवकांनी प्रशिक्षणाचा फायदा घेऊन रोजगारक्षम युवाजागर अभियाना अंतर्गत केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम यशस्वीरित्या राबविला.

हा उपक्रम शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांचे नियंत्रणाखाली युवाजागर अभियानाचे अध्यक्ष श्री.यशवंत शितोळे व विद्यापीठ प्रतिनिधी यांच्या टीमने संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून २३७५० हून अधिक युवकांना सदर योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी मार्गदर्शन केले. हा राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम आपण यशस्वीरित्या राबवित आहोत.

विद्यापीठाचा सर्वांगीण प्रगतीचा हा अहवाल सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. मी येथे आवर्जून नमूद करतो की, विद्यापीठाच्या या सर्वांगीण प्रगतीमध्ये माझे सर्व अधिकार मंडळातील सहकारी, विद्यापीठ अधिविभाग प्रमुख, महाविद्यालयांचे संस्थाचालक, प्राचार्य, समस्त शिक्षक बंधु-भगिनी, विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील प्रशासकीय सेवक या सर्वांचा महत्वाचा वाटा आहे. त्याबरोबरच माझे धडपडणारे तरुण विद्यार्थी आणि त्यांचा सर्व उपक्रमातील सहभाग आणि प्रशासनास त्यांचे होत असलेले सहकार्य हे फारच मोलाचे आहे. त्याबरोबरच महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, केंद्र शासनाच्या सर्व फंडींग एजन्सीज, समाजातील सर्व दानशूर व्यक्ती, वेळोवेळी सहकार्य करणारे इंडस्ट्रीमधील उद्योजक लोक आणि विद्यापीठावर प्रेम करणारे तीनही जिल्हयातील सर्वजण या सर्वांचे हे श्रेय आहे.

आज विशेष योगायोगाची गोष्ट म्हणजे आपल्यामधीलच या संपूर्ण परिसराशी नाते असलेले आणि आपल्या कार्यकतृत्वावर आज सिक्कीम राज्याच्या राज्यपाल पदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळणारे आदरणीय श्री.श्रीनिवास दादासाहेब पाटील हे पाहुणे म्हणून उपस्थित आहेत. त्यांचा परिचय आपणा सर्वांना करुन देणे मी उचित समजतो.

आदरणीय पाटील साहेबांचा जन्म पाटण ता़लुक्यातील मारुल हवेली येथे झाला. बी.ए., एम.ए., एलएल.बी. असे त्यांचे शिक्षण झाले आहे. त्यांनी आपले सर्व शिक्षण कराड, पुणे व मुंबई येथून पूर्ण केले आहे.

सन १९६५ मध्ये राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन उपजिल्हाधिकारी पदी त्यांची नियुक्ती झाली आणि त्यानंतर प्रांता अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, विविध खात्यांचे उपसचिव, अनेक महानगरपालिकांचे आयुक्त, अनेक जिल्हयांचे जिल्हाधिकारी, विभागीय उपायुक्त अशा अनेक उच्च पदी त्यांनी आपली कारकीर्द यशस्वी केली आहे आणि सन १९९९ मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेतून स्वेच्छानिवृत्ती घेऊन त्यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीस सुरुवात केली. लोकसभा निवडणूकीत उच्चांकी मताने ते दोनदा निवडून गेले आणि पुढील संसदीय कारकिर्दीमध्ये अनेक अत्यंत महत्वाच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संसदीय समित्यांमध्ये त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. याबरोबरच सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यामध्येसुध्दा, साहित्य संमेलने, नाटय संमेलने, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, युवा महोत्सव अशा विविध क्षेत्रातील त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. असे सर्वस्पर्शी आणि सर्वच क्षेत्रात यशस्वी ठरलेले पाहुणे आपणासारख्या गुणवंत विद्यार्थ्यांसमोर प्रमुख पाहुणे म्हणून लाभले ही आपणा सर्वांसाठी आनंदाची गोष्ट आहे.

मित्रांनो, आपण सर्वजण पदवधीर, पदव्युत्तर आणि संशोधनातील पदवी घेऊन एका नव्या जगात, नव्या युगात प्रवेश करणार आहात. हे नवे जग वेगवान जग आहे आणि स्पर्धेचे जग आहे आणि आता ही स्पर्धा जागतिक स्तरावरची स्पर्धा आहे त्यासाठी तुम्हाला या पदवीबरोबरच काही महत्वाची जीवनकौशल्ये आणि तंत्रकौशल्ये आत्मसात करावी लागणार आहेत ज्यामुळे तुमच्या पुढील जीवनाचा कार्यकाल सुखद आणि आशादायी होणार आहे. जगातील जवळ जवळ सर्व देशात आपल्या विद्यापीठातील पदवीधर प्रशंसनीय कामगिरी करीत आहेत. त्यामध्ये तुम्ही नक्कीच मोलाची भर घालणार आहात याची मला खात्री आहे. तुमच्या पुढे असलेल्या आव्हानांना तुम्ही समर्थपणे सामोरे जाणार आहात याचा मला विश्वास वाटतो. तुम्हास पुढील वाटचालीस मी या प्रसंगी शुभेच्छा देतो.

!! जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

❑❑❑

प्रकाशक : कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४

मुद्रक : अधीक्षक, शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय, कोल्हापूर-४१६ ००४